# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडणेर.
त. हिंगणघाट, जि. वर्धा, महाराष्ट्र राज्य – ४४२ ३०७
शासन मान्य व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संलग्न
प्रा. दिवाकर गमे
सचिव, वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था
नारोती वार्ड, हिंगणघाट, जि. वर्धा
फोन : 07153-248643, मो. : 9890124285
E-mail : saicollege@rediffmail.com Web : www.saibabacollege.org
NAAC Grade : C
College Code No. 733
डॉ. उत्तम पारेकर
एम.ए.बी.एड.एल.एल.बी.एम.फिल.पीएच.डी.
प्राचार्य
कार्यालय : फोन : (07153) - 255654, प्राचार्य : 255655, प्राचार्य मो. 9921436640
मुख्य लिपीक : मो. 8788970108, वरिष्ठ लिपीक : 9766929642, कनिष्ठ लिपीक : 9421727030

मराठी विषय क्षेत्र अभ्यास मान्यता पत्र

महाविद्यालयात मराठी विभागा द्वारे सत्र २०२३ -२४ मध्ये क्षेत्र अभ्यासा अंतर्गत ग्रामीण भागात बोलल्या जाणाया वऱ्हाडी भाषेचे स्वरूप या क्षेत्र अभ्यासाला महाविद्यालयीन पातळी वर करण्यास परवानगी देण्यात येत आहे .

सदर क्षेत्र अभ्यास विद्यार्थ्या कडून पूर्ण करून घेण्याची जवाबदारी मराठी विभाग प्रमुख डॉ.प्रवीण कारंजकर यांनी पार पाडावी.

दिनांक ०१ ऑगस्ट २०२३

प्राचार्य
Principal
Shri Saibaba Lok Prabodhan
Arts College, Wadner

विषय - मराठी

क्षेत्रअभ्यास – सहभागी विद्यार्थी यादी सत्र २०२३ -२४

| | | | |
|---|---|---|---|
| १] | हर्षा जगन्नाथ डोबले – | B.A III | HJ Dobile |
| २] | पूजा मारोतराव चौधरी – | " | P.M. Chaudhari |
| ३] | संध्या देविदास उमाटे – | " | S.D. Umate |
| ४] | संतोषी महादेवराव बावणे – | " | S M Bawane |
| ५] | प्रतिक्षा बाळकृष्ण कन्नाके – | " | PB Kannake |
| ६] | हर्षल चंद्रशेखर ईखार – | " | Harshal C Ikhar |
| ७] | रुचिता रविंद्र वेले – | " | [signature] |
| ८] | अंचल राजेंद्र वाहदे – | " | |
| ९] | उज्ज्वला सुरेश गुरनुले – | " | U.S. Gurnule |
| १०] | अनुश्री राजेंद्र पाटील – | " | A.R. Patil |
| ११] | वैशाली पांडुरंग आवारी – | " | V.P. Awari |
| १२] | अनुराधा पुंडलीक डोडके – | B.A II | अ. डोडके |
| १३] | गौरव संजय घोडमारे – | " | G.S. Ghode |
| १४] | रमेश कुणाल खिरटकर – | " | R.K. Khirwatkar |
| १५] | अभय विठ्ठल पोहाणे – | " | AV. Pohane |
| १६] | अंचल विठ्ठल खिरटकर – | " | Aanchal Khirwatkar |
| १७] | मन्नू भय्याजी गवळी – | " | T.B. Gawali |
| १८] | राधिका श्रीकांत गोटेफोडे – | " | |
| १९] | समीर सुनिल पवार – | " | Sameer Pawar |
| २०] | आदित्य भारत टेकाम – | " | AB Tekam |

[signature]
Principal
Shri Saibaba Lok Prabodhan
Arts College, Wadner

# श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय ,वडनेर त.हिंगणघाट ,जिल्हा.वर्धा

## क्षेत्रअभ्यास [ field work ]

## विषय - ग्रामीणँ भागात बोलली जाणारी वऱ्हाडी भाषेचे स्वरूप

विषय-मराठी सत्र २०२३ -२४ समन्वयक – डॉ.प्रवीण कारंजकर

---

१] ग्रामीण भागात प्रमाण भाषा बोलली जाते की बोलीभाषा

अ] प्रमाण भाषा ब] बोली भाषा क ] दोन्हीचे मिश्रण ड] माहिती नाही

२ ] बोलीभाषेत प्रमाणभाषेतील शब्दांना पर्यायी शब्द आहेत काय

अ] होय ब] नाही क ] सर्वच शब्दांना पर्यायी शब्द नाहीत ड] माहिती नाही

३ ] ग्रामीण भागातील सुशिक्षितांची भाषा कशी असते

अ] प्रमाण भाषा ब] बोली भाषा क ] दोन्हीचे मिश्रण ड] माहिती नाही

४ ] गावखेड्यातील स्त्रियांचा कल कोणत्या भाषेकडे असतो

अ] प्रमाण भाषा ब] बोली भाषा क ] मराठी हिंदी दोन्हीचे मिश्रण ड] माहिती नाही

५ ] गावखेड्यातील वृद्धांच्या भाषेवरती कशाचा प्रभाव असतो

अ] प्रमाण भाषा ब] बोली भाषा क ] दोन्हीचे मिश्रण ड] माहिती नाही

६ ] ग्रामीण भागातील शेतीशी संबंधित भाषा कशी असते

अ] बोली भाषा ब] पारंपारिक शब्द क ] बोली व पारंपारिक शब्द यांचे मिश्रण ड] माहिती नाही

७ ] मराठी साहित्याचे वाचन ग्रामीण भागात दिसून येते काय

अ] होय ब] नाही क ] धार्मिक साहित्याचे वाचक आहेत ड] माहिती नाही

८ ] ग्रामीण बोलीत विचारांची अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य आहे काय

अ] होय 　　　　ब] नाही 　　　　क ] सांगता येत नाही 　　　　ड] माहिती नाही

९ ] ग्रामीण बोलीत येणाऱ्या हिंदी –इंग्रजी शब्दांचे उच्चार बदलतात काय

अ] होय 　　　　ब] नाही 　　　　क ] सांगता येत नाही 　　　　ड] माहिती नाही

१० ] ग्रामीण बोलीत येणाऱ्या हिंदी –इंग्रजी शब्दांच्या बदललेल्या एका शब्दाचे उच्चार रूप लिहा

------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्नावली भरून देणाऱ्याचे नाव –

गाव - 　　　　त. हिंगणघाट , जिल्हा-वर्धा

स्वाक्षरी

विद्यार्थ्यांचे नाव - 　　　　वर्ग-बी.ए.भाग –

दिनांक 　　मार्च २०२४

विद्यार्थ्यांची स्वाक्षरी

Principal
Shri Saibaba Lok Prabodhan
Arts College, Wadner

श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय ,वडनेर त.हिंगणघाट ,जिल्हा.वर्धा

अहवाल - क्षेत्र अभ्यास [ field work ] - ग्रामीण भागात बोलली जाणारी वऱ्हाडी भाषेचे स्वरूप

विषय-मराठी सत्र २०२३ -२४

समन्वयक –डॉ.प्रवीण कारंजकर

## क्षेत्राभ्यास – ग्रामीण भागात बोलली जाणारी वऱ्हाडी भाषेचे स्वरूप

श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय वडनेर त. हिंगणघाट च्या मराठी विभागा द्वारे बोली भाषेचे स्वरूप ( वडनेर परिसरातील गावांच्या संदर्भात) हा क्षेत्राभ्यास सत्र २०२३ -२४ मध्ये घेण्यात आला.

डॉ प्रवीण कारंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या मराठी विषयाच्या या क्षेत्राभ्यासात ऐकून विस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी असनारे सर्व विद्यार्थी बी.ए.भाग-३चे असून त्यांनी परिसरातील पोहणा, दोंदुडा , टेभा, पिपरी,वेणी, वडनेर इत्यादी गावातील लोकांना मराठी विभागा तयार करून दिलेली प्रश्नावली विचारून त्यांची मते जाणून घेतली

वऱ्हाडी ही भाषा ग्रामीण भागात जास्त वापरली जाते आणि शहरी भागात प्रमाण भाषा

खरंच , माझ्या आतापर्यंतच्या अनुभवावरून, वऱ्हाडी भाषा ही वऱ्हाडात व्यवहाराची भाषा मानली जाते जर कुणी वऱ्हाडी भाषा बोललं तर हा ग्रामीण भागातला गावंढळ" , जसे कोकणी, किंवा बाकी भाषा लोक सर्रासपणे बोलतात तस्स इकडे नाही .

प्रत्येक भाषा स्वतः मधे सुंदर आणि उत्कृष्ठ भाषा असते, त्यामुळे त्याची दुसऱ्या भाषेशी तुलना आपण एखाद्या भाषेचा दर्जा ठरवू शकत नाही.

या क्षेत्राभ्यासा अंतर्गत ग्रामीण भागात प्रमाण भाषा बोलली जाते की बोली भाषा याचा अभ्यास केल्यावर असे दिसून काल की केवळ बोली भाषा किंवा केवल प्रमाणभाषा असा संवाद व्यवहार ग्रामीण भागात न होता तो बोलीभाषा व प्रमाण भाषा यांच्या मिश्र स्वरूपाचा आहे असे दिसून आलेले आहे.

ग्रामीण भागातील सुशिक्षीतांची भाषा कशी असते याचा अभ्यास केल्यावर उससे दिसून आले आहे की सुशिक्षीत वर्गाचे अध्ययन अध्यापण प्रमाण भाषेत होत असले तरी ग्रामीण भागात वावरणारा

विद्यार्थी प्रत्यक्ष संवाद व्यवहारात केवळ प्रमाण भाषा न वापरता कींवा बोली भाषा बोलता प्रमाण भाषा व बोली भाषण यांच्या मिश्रणातून निर्माण होणारी भाषा बोलत असतो.

बोली भाषेचा वापर ग्रामजीवनातील दैनंदीन व्यवहारात होत असला तरी सुशिक्षीत वर्ग प्रमाण भाषेचाही बोलतांना सहजपणे वापर करतो पण बोली भाषेत प्रमाण भाषेतील सर्वच शब्दांना पर्यायी शब्द नाहीत असे सर्वक्षणात अनेकांनी मत दिले . त्याच प्रमाण बोली भाषेतील शब्दांना समानार्थी असे प्रमाणभाषेतील शब्दही नाहीत असेही दिसून आलेले आहे.

बोली भाषेचे स्वरूप लक्षात होतांना एक बाब प्रकर्षाने लक्षात आली ती ही की बोलीभाषा व प्रमाण भाषा सरळ मिसळीने ग्रामीण भागात बोलली जाते तथापि ग्रामीण भागातील स्त्रियांचा भाषेत बोली चे शब्द अधिक आहेत तर प्रमाण भाषेचे शब्द कमी आहेत, विशेषत: ज्या स्त्रिया निरक्षर आहेत त्यांच्यात बोली भाषेचा प्रभाव अधिक दिसून येतो.

ग्रामीण भागातील स्त्रियाप्रमाणेच बोली भाषेचा प्रभाव वृद्धाच्या भाषेवरही अधिक दिसून येतो, साठ वर्ष किंवा त्या पेक्षा जास्त वयोगटाचे लोक प्रमाण भाषेती शब्दांपेक्षा बोली भाषेतील शब्द भाषेत योजतांना दिसतात. प्रमाण भाषेतील अनेक शब्द वृद्धासाठी अपरिचयाचे आहेत आपल्या भावना व विचार व्यक्त करण्यासाठी ही मंडळी बोली भाषेला अधिक वापर करतात.

ग्रामीण भागाचा संबंध हा कृषीजीवनाशी येतो. त्यामुळे कृषी किंवा शेती व्यवसायाशी संबंधीत भाषा ही प्रमाण भाषण नसते तर बोलीभाषा असते.ही बोली भाषा शेतीशी संबंधीत वेगवेगळे शब्द सामावून घेणारी आहे. या शब्दांना प्रमाण मराठीत पर्यायी शब्द नाहीत असे दिसून आलेले त्यामुळे कृषी जीवनाची भाषा ही बोलीभाषा आहे.

मराठी साहित्याचे वाचन ग्रामीण भागात केले जाते काय याचा अभ्यास केल्यावर असे दिसून आले आहे की ग्रामीण भागात मराठी साहित्याचे वाचल ज्या अर्थाने आपण साहित्य वाचन याचा अर्थ घेत असतो त्या अर्थी होत नाही.कादंबरी , नाटक, कविता इत्यादी सारखे साहित्य प्रकार वाचणारा वर्ग 'क्वचितच दिसत येतो. तथापि मराठी संत साहित्याचा प्रभाव ग्रामीण भागात आहे, ज्ञानश्वरी,एकनाथी भागवत, रामदासांचा दासबोधसंत नामदेवाची अभंग गाथा,तुकडोजी महाराजांची ग्रामगीता यासारखे संत साहित्य ग्रामीण भागातील अनेकांच्या घरी आजही दिसून येते

ग्राम जीवनाचा संवाद व्यवहार चालतो तेव्हा विचारांची अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य या बोली भाषेत आहे काय याचा अभ्यास केल्यावर असे दिसून आलेले करते की जीवनातील संवाद व्यवहाराचे माध्यम असणारी बोली भाषा ही विचारांची अभिव्यक्ती करण्याचे सशक्त माध्यम आहे.प्रत्येक ग्रामीणांचा संवाद व्यवहार पूर्ण करण्याचे सामर्थ्य या बोली आहे.

ग्रामीण बोली भाषेत अनेक हिंदी- इंग्रजी भाषेतील शब्द येतात या शब्दांचा उच्चार प्रत्यक्ष संवाद व्यवहारात बदलतांना दिसतो , याचे कारण वेगळया प्रांताची किंवा अपरिचीत भाषा बोलतांना संवादकाला त्याचा नेमका उच्चारा बद्दल माहिती नसते हे होय.

निष्कर्ष -

१) वडनेर परीरसरातील गावांच्या बोलीभाषेत दैनंदिन संवादात सरळ मिसळची भाषा बोलली जात असल्याचे दिसून येते.गावात बोली भाषा आणि प्रमाण भाषा यांचे मिश्रित रूप दिसून येते.

२ ) बोली भाषेत प्रमाण भाषेतील काही शब्दांना समानार्थी शब्द आहेत तर काही शब्दांता पर्याय उपलबद्ध नाहीत.

३) ग्रामीण भागातील नवशिक्षीत वर्ग हा प्रमाण व बोलीभाषा यांची सरळ मिसळ करून आपला संवाद साधतांना दिसतो.

४) ग्रामीण भागातील स्त्रियाचा भर बोली भाषेवर अधिक आहे. विशेषतः निरक्षर स्त्रिया बोलीत आपला संवाद करतात.

५ )गावातील वृद्ध बोली भाषा दैनंदीनव्यवहारात अधिक प्रमाणात वापरतात.

६ )बोली भाषा शेतीशी संबंधीत अनेक शब्द सामावून घेणारी आहे.तीची कृषी क्षेत्रातील जागा प्रमाणभाषा घेऊ शकत नाही.

७ ) मराठी संत साहित्याचा प्रभाव ग्रामीण भागातील लोकावर सर्वाधिक दिसून येतो. साहित्याचे नवीन प्रकार मात्र त्यांनी स्वीकारलेल नाही

८ ) ग्रामीण बोली परीपूर्ण असून ग्रामजीवनातील सर्व संवाद व्यवहार पूर्ण करण्याचे सामर्थ या बोलीत आहे

९ )ग्रामीण बोली भाषेत इंग्रजी आणि हिंदी शब्द येतात तेव्हा त्याच्या उच्चारांचे रूप बदललेले दिसून येते.

१०) बोली भाषेत प्रमाण भाषेतील शब्द व परभाषेतील शब्दांची रूपे बदलतात. हे उच्चार ग्रामीण बोलीच्या उच्चाराला अनुकूल केले जातात.

ग्रामीण बोलीभाषेत इंग्रजी आणि हिंदी शब्दांचे उच्चार पुढील प्रमाणे बदलताना दिसतात

| अ.क्र. | इंग्रजी भाषेतील शब्द | बोलीभाषेतील उच्चार |
|---|---|---|
| १ | ग्लास | गिलास |
| २ | सीम कार्ड | शिम कारड |
| ३ | सिनेमा | शिनिमा |
| ४ | डॉक्टर | डाक्टर |
| ५ | हॉस्पिटल | हास्पिटल |
| ६ | मार्केट | मारकेट |
| ७ | बॅग | ब्याग |
| ८ | रेल्वे | रेल्वेल |
| ९ | ड्रायव्हर | डायवर |
| १० | क्रिकेट | किरकेट |

| अ.क्र. | प्रमाण भाषेतील शब्द | बोलीभाषेतील उच्चार |
|---|---|---|
| १ | काळा | काया |
| २ | वीज | ईज |
| ३ | पार्वती | पारबती |

| | | |
|---|---|---|
| ४ | थंडी | हिव |
| ५ | पावसाळा | बरसात |
| ६ | मृग | मीरुग |
| ७ | या वर्षी | यंदा |
| ८ | मागच्या वर्षी | गुदस्ता |
| ९ | ऋण | कर्ज |
| १० | सकाळचे जेवण | न्याहरी |
| ११ | मोटर सायकल | फटफटी |
| १२ | सायकल | शायकल |
| १३ | बैल गाडी | बंडी |
| १४ | नोकरी | नवकरी |
| १५ | कपाळ | मस्तक |

| अ.क्र. | हिंदी भाषेतील शब्द | बोलीभाषेतील उच्चार |
|---|---|---|
| १ | जानवर | जनावर |
| २ | प्याला | पेला |
| ३ | जल्दी | जलद |
| ४ | मुझे | मेरेको |
| ५ | तुझे | तेरेको |

झाडी बोली आणि वऱ्हाडी बोली –

झाडीबोलीतील काही शब्द व त्यांचे अर्थ-

अनुला- अळणी, कुर- आडनाव, गडा- खडा, धातू- वीर्य, झाल- मोठे टोपले, डूक- गढूळ, बाया- बाजूला, ठक- थकवा, फुपु- आत्या, डग्लया- घरजावई इत्यादी

वऱ्हाडी आणि झाडी बोलीभाषेत काही अंशी भेद आढळून येतात. गूळ या शब्दाचा उच्चार वऱ्हाडीत 'गुय' तर झाडीबोलीत 'गुर' असा होतो. 'छ' या व्यंजनाचा उच्चार झाडीत होत नाही. उदा. छत्री- सत्ता, छप्पर- सप्पर इत्यादी. 'ळ' चा 'य' आणि 'र' यासारखे थोडेबहुत उच्चारभेद वगळता दोन्ही बोलीत व्याकरण आणि भाषाशास्त्रीयदृष्ट्या फारसे भेद नाहीत.

झाडीबोलीत अनेकदा व्यंजनात एकवचनी पुल्लिंगी नामांचे अनेकवचन होताना 'आ' स्वर येतो. उदा. केस- केसा, पाने- पान्ना इत्यादी.

## वऱ्हाडी बोली ची विविध रूपे

नागपुरी बोली

चंद्रपुरी बोली

आणि वऱ्हाडी बोली

बोलीभाषेला त्या मातीचा गंध असतो. पश्चिम विदर्भात अमरावती जिल्ह्यात बोलली जाणारी वऱ्हाडी आणि अकोला जिल्ह्यात बोलली जाणारी वऱ्हाडी यातही सूक्ष्म फरक दिसतो.

'हळ्या डांगीवर बसला हाये' (अमरावती) (कावळा फांदीवर बसला आहे). हळ्या डांगीवर बसेल हाये' (अकोला) या ठिकाणी 'बसला' आणि 'बसेल' अशी दोन बदललेली क्रियापदे आहेत. 'इथं बस नं गा' (अमरावती), 'अधि बसाना' (अकोला) (इथे बसा ना) असे सूक्ष्म बदल आहेत. शब्दफेकीची लकबसुद्धा प्रादेशिकतेनुसार बदलते.वऱ्हाडातील मुसलमान उर्दूमिश्रित हिंदी बोलतात. बोलताना त्यांनी काढलेली 'हेल' मात्र वऱ्हाडीशी तंतोतंत जुळते. 'कौंसे गावकू जा रहा रे।।...कब आयेंगा रे तू...' 'गुरुजी ये लडका इस्कूल में जाताच नही ना...तुम कुछ करो ना गुरुजी इसके लिये' महानुभवपंथाच्या 'लीळाचरित्र', 'गोविंद प्रभुचरित्र' या ग्रंथात या भाषेचा उगम आढळतो. संस्कृत भाषेत ग्रंथनिर्मिती करणाऱ्या केसोबासाला नागदेवाचार्य सांगतात, 'नकोगा केशव दया येणे माझिया म्हातारिया नागबैल मज श्री चक्रधरे निरिचिली मऱ्हाटी : तियांचि पुसा'. त्याकाळी सामान्य माणूस, स्त्री शूद्रांनाही कळावी यासाठी महानुभाव पंथाच्या

अनुयायांनी जाणीवपूर्वक लोकवाणीचा वापर लेखनासाठी केला. या ग्रंथांची निर्मिती झालेले गाव रिद्धपूर हे वऱ्हाडातील अमरावती जिल्ह्यात आहे. 'रिद्धपूर आणि परिसरातील गावांची वर्णने' या ग्रंथांत त्या गावांच्या लोकजीवनासह-लोकभाषेसह या ग्रंथांत उतरली आहेत. तत्कालीन महाराष्ट्राची प्रमाणभाषा ही वऱ्हाडात बोलली जाणारी बोली होती. हे महानुभावांच्या महत्त्वपूर्ण ऐतिहासिक ग्रंथावरून दिसते. लोकपरंपरेत आलेली, माळी पौर्णिमेची, दिवाळीची, पोळयाची, गाई गोधनाची गाणी, आवने (कोडी) यांनी वऱ्हाडी बोली समृद्ध आहे. दसऱ्यानंतर माळी पौर्णिमा हा बाहुल्यांचा सण. मुली दसऱ्यापूर्वी भुलया (बाहुल्या) बसवतात. माळी पौर्णिमेला त्या उठवतात. तेव्हा म्हटली जाणारी भुलाबाईची गाणी हे वऱ्हाडी बोलीला वारसा हक्कानं मिळालेलं धन आहे-

'पयली गं पुजाबाई, देव देव सादेव, साहतीचा खंडोबा, खेळी खेळी खंडोबा

खंडोबाच्या नारीबाई, वरच्या वरच्या आवसनी, आवसनीचं पानी जसं, गंगेचं पानी...'

दिवाळीत लव्हाळयाच्या काड्यांनी तयार केलेल्या झेंडाईवर भाताचा दिवा लावून दिवाळीची गाणी सुरू होतात. पोळा सणाला बैल पोळयात उभे झाल्यावर 'अभाय गडगडे, शिंग फडफडे, तुह्या मायनं केले भोंगाचे वडे' या प्रकारच्या होणाऱ्या झडत्या, नागपंचमीला 'हरे रामा नागोबाले, चुकलं भाकलं माफ करा...' या होणाऱ्या नागोबाच्या बाऱ्या किंवा महाशिवरात्रीला मोठ्या महादेवाला सातपुड्यात लोकगजर होतो. 'महादेवाच्या वाटेन गा घोट घोट पाणी नदी लागला पोह्यनी' ही महादेवाची गाणी विविध सणाच्या निमित्ताने वऱ्हाडी बोलीचे लोकवाङ्मयातील सर्व आपल्या मूळ चेहऱ्यासह उतरली आहेत.

वऱ्हाडी बोली ही म्हणी आणि वाक्प्रचारांनी समृद्ध आहे. लेक माहा टिकोबा चारी बैले इकोबा, रांधता येईना वले लाकडं, दिवस मावळला टेकळयाले गधे जुपले छकळयाले, आईबाई नाळली, शेजारीन जोळली, कामावक्ती आईबाई, कामसरलं तं नातं नाही, आंगावर पळली गोम ते उचलीन कोन?, कामाले दंदी खायाले आंदी, नोट करे गोठ चिल्लर करे इचार, हेल्याच्या टकरीत वावराचा नास या म्हणी उदाहरणादाखल इथे दिल्या आहेत.

जे शब्द इतर भाषेत अश्लील समजले जातात, ते वऱ्हाडी बोलीमध्ये सहज वापरले जातात. 'इचिभिन, मह्यं काम आज झालंच नाही. 'हात् तिया मायले नेयं तं....हा त्यातील काही उदाहरणे. पश्चिम विदर्भात बोलली जाणारी वऱ्हाडी आँणि पूर्व विदर्भात बोलली जाणारी नागपूर परिसरातील नागपुरी आणि चंद्रपूर भागात बोलली जाणारी चंद्रपुरी बोली यांच्यामध्येही शाब्दिक उच्चारात फरक आहे.

प्रमाण भाषेत 'मी काम करीत आहे' हे वाक्य वऱ्हाडीत 'मी काम करून राह्यलो' असे होते. चंद्रपुरीमध्ये ' मी काम करतो नं जी' असे होते! करजो, जाजो, येजो शब्दांची रूप क्रियापदं म्हणून वापरतात. 'उद्या तू गावाले जाजो' (उद्या तू गावाला जाशील) 'तू माह्य काम करजो' (तू माझं काम करशील) 'आमच्या इतच्या लग्नाला येजो' (आमच्या घरच्या लग्नाला येशील)

पूर्व विदर्भाचा भाग असणाऱ्या चंद्रपुरी बोलीमध्ये नागपुरी बोलीमध्ये वऱ्हाडीची लकब थोड्याफार फरकाने आढळते. उदा. प्रमाणभाषेत 'सकाळ' हा शब्द वऱ्हाडीमध्ये 'सकाय' असा होतो. तोच चंद्रपुरी आणि नापुरीमध्ये 'सकार' असा होतो

.काही ठिकाणी कर्त्याच्या लयामध्येसुद्धा बदल होतो. उदा. 'मी हे काम केले' (प्रमाण) '

म्या हे काम केलं' (वऱ्हाडी),

'मीनं हे काम केलं!' (चंद्रपुरी)

आदरार्थी वाक्यांमध्ये बदल जाणवतात- उदा. 'कुठे निघालात?' (प्रमाण - मराठी).

'कुठं चाल्ले हो?' (वऱ्हाडी). '

कोठे चाल्ले जी?' (चंद्रपुरी/नागपुरी).स्त्रि

यांच्या तोंडी असणाऱ्या वाक्यांमध्येसुद्धा बदल झालेला दिसतो. 'काय मायतुले अजून मईत नाई बिचारे... मले त बाईनं सकायीच सांगतलं. (वऱ्हाडी).

'तुज मईत नई काय वं आमच्या घरच्याईन सकारीच सांगीतलन.' (चंद्रपुरी)

तुला माहीत नाही का गं? यांनी तर मला सांगितलं. (प्रमाण मराठी) किंवा कुठे गेली होतीस गं (प्रमाण) कुठीसा गेल्ती वं?

(वऱ्हाडी) कोटी गेल्ली गे (चंद्रपुरी) प्रमाण गं चा वं, गे होताना दिसतो. बोलीभाषा याच मुळात भाषेचे संवर्धन करण्याचे काम करतात.भाषेची निखळता व जिवंतपणा बोलीभाषेमुळेच कायम आहे.

Principal
Shri Saibaba Lok Prabodhan
Arts College, Wadner

Vena Lok Prabodhan Shikshan Sanstha, Hinganghat's

# SHRI SAIBABA LOK PRABODHAN ARTS COLLEGE, WADNER

Th.Hinganghat, Dist.Wardha

NAAC Accredited with Grade 'C' (CGPA-1.95)

(Affiliated to Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur)

Website : www.saibabaartscollege.edu.in
Email : saicollege@rediffmail.com

## COURSE COMPLETION CERTIFICATE

This Field Project / Field Work completion certificate is awarded to

Mr. / Ku. Harsha J. Dhobale

Class B.A III in the academic Year 2023- 2024

For successfully completing ग्रामीण भागात बोलल्या जाणाऱ्या वऱ्हाडी भाषेचे स्वरूप.

on date २७/०३/२०२४

Co-ordinator | IQAC Co-ordinator | Principal

## श्रीसाईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडणेर.

## ता,हिंगणघाट ,जिल्हा – वर्धा

### गृहअर्थशास्त्र विभाग (Department of Home-Economics)

### विषय :- ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य आणी पोषण

### ( गृहअर्थशास्त्र विषय संदर्भात - क्षेत्रीय कार्य)

---

# क्षेत्रीय कार्य – अहवाल (Field Work - Report)

## सत्र – 2023 : 2024

### प्रस्तावना (Introduction):

ग्रामीण महिलांचे आरोग्य आणि पोषण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. महिलांचे आरोग्य उत्तम असल्यास त्यांच्या कुटुंबाचे आणि पर्यायाने संपूर्ण समाजाचे आरोग्य सुधारते. मात्र, ग्रामीण भागातील महिलांना आरोग्याच्या आणि पोषणाच्या दृष्टीने अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कुपोषण, आरोग्य सेवांचा अभाव, मासिक पाळी दरम्यान अस्वच्छता, तसेच पोषणाबाबत कमी जागरूकता यांसारख्या समस्या ग्रामीण महिलांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम घडवतात.

या पार्श्वभूमीवर, ग्रामीण महिलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीचा सखोल अभ्यास करणे गरजेचे वाटते. या प्रकल्पाचा उद्देश महिलांच्या आरोग्यविषयक समस्या ओळखणे, त्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा समजावून घेणे, तसेच पोषणाच्या संदर्भातील त्यांच्या सवयींचा आढावा घेणे हा आहे. याशिवाय, या समस्या सोडवण्यासाठी योग्य उपाययोजना सुचवणे आणि त्याद्वारे महिलांमध्ये जागरूकता निर्माण करणे देखील महत्त्वाचे आहे.

सदर प्रकल्पामधून महिलांच्या आरोग्यविषयक समस्या स्पष्ट होतील, तसेच स्थानिक पातळीवर कोणत्या उपाययोजना राबवता येतील, याबाबतही दिशा ठरवता येईल. हा अभ्यास ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरेल आणि आरोग्य व पोषणाच्या दृष्टीने सकारात्मक बदल घडवेल, अशी अपेक्षा आहे. हे जाणूनघेण्याकरीता त्यांच्या अनुभवांचे सर्वेक्षण महाविद्यालयातील 20 विद्यार्थ्यांनी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे क्षेत्रीय कार्य अंतर्गत 100 प्रश्नावलीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या मुलभूत समस्यांचे विविध प्रश्नांद्वारे माहितीचे संकलन केले.

**नमुना सारणी: प्रश्न आणि उत्तरे यांचे विश्लेषण**

**महिलांच्या आरोग्य आणी पोषण समस्यांवरील उत्तरांचा आढावा**

| क्रमांक | प्रश्न | हो म्हणणाऱ्या महिलांची संख्या | नाही म्हणणाऱ्या महिलांची संख्या | इतर/तपशील |
|---|---|---|---|---|
| 1 | तुम्हाला नियमित आरोग्य तपासणीसाठी डॉक्टरांकडे जाता येते का? | 35 | 65 | ----- |
| 2 | तुम्हाला पोषणाबद्दल माहिती मिळाली आहे का? | 40 | 60 | ----- |
| 3 | मासिक पाळी दरम्यान सॅनिटरी नॅपकिन्स वापरता येतात काय? | 50 | 50 | ----- |
| 4 | तुमचा आहार पोषण युक्त आहे असे वाटते का? | 25 | 60 | इतर 15 |
| 5 | तुम्हाला पोषण योजनेचा लाभ मिळतो का? | 25 | 60 | इतर 15 |
| 6 | तुमची शैक्षणिक पात्रता काय आहे? | निरक्षर:5 | प्राथमिक:20 | माध्यमिक:25<br>उच्च शिक्षण :50 |
| 7 | गेल्या सहा महिन्यात कोणती गंभीर आजार झाली आहेत का? | 05 | 95 | कोरोनाचे कारण जास्त महिलांनी सांगीतले |
| 8 | कोणत्या आरोग्य योजनांचा लाभ घेतला आहे? | जननी सुरक्षा :40 | मातृ वंदना :30 | इतर :30 |
| 9 | तुम्ही दररोज कोणता आहार घेता? | फळे आणी भाज्या:40 | कडधान्य :30 | तांदूळ व पोळी:20 इतर :10 |
| 10 | आहार पोषण युक्त आहे असे वाटते का? | 50 | 50 | ---- |
| 11 | पोषणाबाबत मार्गदर्शन मिळाले | 75 | 25 | मार्गदर्शन:शिक्षकांकडून(75 महिलांनी सांगितले) |

| | काय? | | | |
|---|---|---|---|---|

## विश्लेषण (Analysis):

ग्रामीण महिलांच्या आरोग्य आणि पोषण विषयक प्रश्नांची उत्तरं तपासल्यानंतर पुढील महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले:

1. आरोग्य सेवा:

65% महिलांना नियमित आरोग्य तपासणीसाठी डॉक्टरांकडे जाता येत नाही.
95% महिलांना गेल्या सहा महिन्यांत गंभीर आजार झाला नाही, परंतु 5% महिलांनी कोरोनाशी संबंधित त्रासाचा उल्लेख केला.
आरोग्य तपासणीला कमी प्राधान्य दिले जात असल्याचे या आकडेवारीतून स्पष्ट होते.

## पोषण स्थिती:

40% महिलांना पोषणाबाबत माहिती मिळाली आहे, तर 60% महिलांनी माहितीच्या अभावाचे संकेत दिले.
50% महिलांनी सांगितले की, त्यांचा आहार पोषणयुक्त आहे, मात्र उर्वरित महिलांना त्यांच्या आहारात पोषणाचा अभाव असल्याचे वाटते.
फळे, भाज्या, कडधान्ये यांसारख्या पोषणयुक्त आहाराचे प्रमाण कमी असून, काही महिलांनी केवळ तांदूळ व पोळीवर आधारित आहार घेतल्याचे सांगितले आहे.

## शिक्षण आणि योजना:

50% महिलांनी उच्च शिक्षण घेतले आहे, मात्र अजूनही पोषण योजनांचा लाभ घेण्यास अनभिज्ञता दिसून येते.
केवळ 25% महिलांनी पोषण योजनांचा लाभ घेतला असल्याचे सांगितले, जे अशा योजनांचा प्रभाव ग्रामीण पातळीवर कमी असल्याचे दर्शवते.
जननी सुरक्षा योजना आणि प्रधानमंत्री मातृ वंदना योजनांमध्ये सहभाग असलेल्या महिलांचे प्रमाण अनुक्रमे 40% आणि 30% आहे.

## पोषणाबाबत मार्गदर्शन:

75% महिलांनी पोषणाबाबत मार्गदर्शन मिळाल्याचे सांगितले, तर 25% महिलांनी कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन मिळाले नसल्याचे स्पष्ट केले.

## निष्कर्ष (Conclusion):

ग्रामीण महिलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे गरजेचे आहे.

महिलांना पोषण योजनांचा लाभ मिळण्यास अडथळे आहेत.

नियमित आरोग्य तपासणीसाठी साधने व जागरूकता अभाव असल्याचे दिसून आले.

पोषणयुक्त आहार घेण्याबाबत असलेली कमतरता आणि जागरूकतेचा अभाव लक्षात घेता, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शिबिरे आणि मार्गदर्शन सत्र आयोजित करण्याची गरज आहे.

## शिफारशी (Recommendations):

**1. आरोग्य तपासणीसाठी उपाययोजना:**

आरोग्य शिबिरे ग्रामीण भागात नियमितपणे भरवावीत.

आरोग्य तपासणीसाठी मोबाईल क्लिनिक सेवा सुरू करावी.

महिलांना प्राथमिक उपचार आणि आरोग्य शिक्षण देण्यासाठी स्थानिक स्वयंसेवकांची मदत घ्यावी.

**2. पोषणाबाबत जागरूकता:**

पोषणयुक्त आहाराचे महत्त्व पटवून देण्यासाठी महिलांसाठी कार्यशाळा आयोजित कराव्या.

शाळांमध्ये मुलींना पोषण शिक्षण देण्यावर भर द्यावा, जेणेकरून पुढच्या पिढ्याही अधिक सजग होतील.

**3. सरकारी योजना:**

सरकारी योजनांचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रचार व मार्गदर्शन वाढवावे.

स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून या योजनांचे लाभ प्रोत्साहनाद्वारे देणे.

**4. जागरूकता मोहीम:**

महिलांसाठी पोषण आणि आरोग्याबाबत प्रचार मोहिमा आयोजित करणे.

प्रौढ साक्षरता कार्यक्रमाद्वारे निरक्षर महिलांपर्यंत माहिती पोहोचवणे.

"ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्य आणि पोषण स्थिती सुधारण्यासाठी, सरकारी आणि स्थानिक पातळीवर प्रभावी योजना अंमलात आणण्याची आवश्यकता आहे. महिलांच्या आरोग्य, पोषण, आणि शैक्षणिक प्रगतीसाठी एकत्रित प्रयत्न हेच त्यांची जीवनशैली सुधारण्याचे साधन ठरतील."

## क्षेत्रीय कार्य करतांना महाविद्यालयातील विद्यार्थी

| | | | |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| **कु.संध्या उत्तम केराम** | **कु. शामल अनंता कैकाडे** | **कु.राखी राजेश निसार** | **स्वाती रमेश संकुलवार** |
|  |  |  |  |
| कु . प्रतीक्षा प्रशांत थुल | कु . साक्षी गजानन नौकरकर | कु दिशा अरुण भोरे | कु . तृप्ती संजय नंदरे |

Principal
Shri Saibaba Lok Prabodhan
Arts College, Wadner

| Sr.No. | Student Name | Class | Mobile No. |
|---|---|---|---|
| 1 | Trupti Sanjay Nandare | B.A.III | 8010504389 |
| 2 | Monika Vinod Upate | B.A.III | 8788379935 |
| 3 | Rasika Shrikrushnaji Kulsange | B.A.III | 8975839414 |
| 4 | Komal Uttam Zode | B.A.III | 9552771743 |
| 5 | Disha Arun Bhore | B.A.III | 9322979007 |
| 6 | Payal Gajanan Sewekar | B.A.I | 9307443958 |
| 7 | Shivani Bhaskar Tadas | B.A.I | 9322579763 |
| 8 | Pranali Ankush Kubade | B.A.I | 7972777156 |
| 9 | Achal Sajay Bidwaik | B.A.II | 9096465810 |
| 10 | Pratiksha Prashant Thool | B.A.III | 9209267790 |
| 11 | Shkshi Gajanab Naukarar | B.A.III | 9322167416 |
| 12 | Shamal Ananta Kaikade | B.A.III | 7378780047 |
| 13 | Shital Prabhakar Kumbhalkar | B.A.III | 9049641354 |
| 14 | Shubhangi Pandurang Maraskolhe | B.A.III | 8972248747 |
| 15 | Swati Rameshrao Sankulwar | B.A.III | 7796717487 |
| 16 | Sandhya Uttam Karam | B.A.III | 7498160586 |
| 17 | Rakhi Rajesh Nisar | B.A.III | 8010483354 |
| 18 | Ashwini Subhash Adhal | B.A.III | 9373004916 |
| 19 | Akansha Shankarraom Madavi | B.A.III | 8010932816 |
| 20 | Neha Manik Chatare | B.A.III | 9529635707 |

दिनांक :10/ 04/ 2024

प्राचार्य

Principal
Shri Saibaba Lok Prabodhan
Arts College, Wadner

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय , वडनेर , ता. हिंगणघाट , जिल्हा. वर्धा

इतिहास विभाग ( *History Department* )

# विषय : छत्रपती संभाजी  महाराजांच्या जीवन चरित्राच्या विशेष संदर्भात : ऐतिहासिक घटनांचा आढावा

.......................................................................................................................................

## क्षेत्रीय कार्य अहवाल (*Field work – Report* )

श्री शंभो: शिवजातस्य मुद्राधौरिव राजते

यदं कसेविनी लेखा वतर्ते कस्यनोपरि

*महाराष्ट्राच्या इतिहासातिल एक वादग्रस्त व्यक्तिमत्व म्हणून स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्याकड़े बघितले जाते. मराठ्यांच्या स्वराज्याचे  दूसरे  छत्रपती संभाजीराजे होते . एक अत्यंत पराक्रमी बुद्धिमान राजपुत्र असून बखराकारांनी छ. संभाजी महाराजांचा इतिहास विकृत लिहलेला आहे. तेव्हा अनेक इतिहासकारांनी छ. संभाजीराजे यांचा इतिहास समाजासमोर आणला. तो खरा इतिहास विद्यार्थी व समाजासमोर यावा या उद्देशाने छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्राच्या विशेष संदर्भात : ऐतिहासिक घटनांचा आढावा या विषयावर इतिहास विभागद्वारे क्षेत्रिय  अभ्यास करण्यात आला. समाजात छ. संभाजी महाराज यांच्या इतिहासाबद्दल किती प्रमाणात जाण आहे व त्यांच्यात अधिकचा इतिहास जानून घेण्यास  अभिरुचि निर्माण व्हावी यासाठी त्याच्या जीवनचरित्राशी संबधित  घटनावर आधारित प्रश्नांची  प्रश्नावली तयार करन्यात आली.  प्रश्नावलीत १० प्रश्न समाविष्ट करण्यात आले. व या क्षेत्रीय अभ्यासाला बी.ए .या पदाविला इतिहास विषय घेतलेल्या १० विद्यार्थ्याची निवड करण्यात आली.  प्रत्येक विद्यार्थ्यानी आपल्या गावातील १० लोकांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहितीचे संकलिकरण करण्यात आले.  व  त्या माहितीचे  वर्गीकरण , तालिकाकरन करण्यात आले व शेवटी निष्कर्ष काढन्यात आला.*

## प्रश्नावली वर्गीकरण

| | |
|---|---|
| सारणी क्र. 1 | तुमच्या गावात छ. संभाजी महाराजांची जयंती कोणत्या दिवशी साजरी केली जाते ? |
| | ५८ – १४ मे , २२ - १२ मार्च , २० – १९ फेब्रुवारी |
| सारणी क्र. 2 | छ. संभाजी महाराज यांचा जन्म कोणत्या किल्ल्यावर झाला ? |
| | ६० – पुरंदर , ४० – रायगड , |
| सारणी क्र.3 | छ. संभाजी महाराज यांच्या आईचे नाव काय होते ? |
| | ९८ – सईबाई , ०२ – जीजाबाई , |
| सारणी क्र.4 | छ. संभाजी महाराज यांच्या मुलांचे नाव काय होते ? |
| | १०० -शाहू , ०० - राजाराम , |
| सारणी क्र. 5 | छ. संभाजी महाराज यांनी खालीलपैकी कोणत्या ग्रंथाचे लेखन केलेले होते ? |
| | ९० – बुधभूषण , १० - आज्ञापत्रे , |
| सारणी क्र. 6 | छ. संभाजी महाराज यांच्या पहिल्या पत्नीचे नाव सांगा ? |
| | ९७ – येशुबाई , ०३- ताराबाई , |
| सारणी क्र. 7 | छ. संभाजी महाराज यांची हत्या कोणी केली ? |
| | ९९ - औरंगजेब , ०१ – शाहिस्तेखान |
| सारणी क्र.8 | छ.संभाजी महाराज यांची हत्या कधी करण्यात आली ? |
| | ८५ – ११ मार्च १६८९ , १५ – १४ मार्च १६९० |
| सारणी क्र. 9 | छ. संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक कोणत्या किल्ल्यावर संपन्न झाला ? |
| | ९९ – रायगढ़ , ०१- सिंहगढ़ |
| सारणी क्र.10 | छ. संभाजी महाराज यांची समाधीस्थळ महाराष्ट्रात कुठे आहे ? |
| | ९७ – वढु (बद्रुक ) , ०३ – तुळापुर |

**विश्लेषण :**

इतिहास विषयाच्या माध्यमातून स्थानिक वडनेर परिसरातील लोकांना छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्राच्या संदर्भात क्षेत्रिय अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात विद्यार्थ्यांनी घरोघरी जावून प्रश्नावली तील प्रश्न विचारून माहिती संकलित केलेली आहे. त्यात ग्रामीण समाजातील लोकांना छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती केव्हा साजरी करण्यात येते ? याबाबत ५८ उत्तरदात्यानी १४ मे ही तारीख सांगितली,तर २२ उत्तरदात्यानी १२ मार्च ही तारीख सांगितली. व २० उत्तरदात्यानी १९ फेब्रुवारी अशी माहिती दिली. यावरून लक्षात येते की, छ.संभाजी महाराज यांची जयंती तारीख बहुतेक लोकाना माहित नाही .व ग्रामीण समाजात संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी होत नसावी.छ. संभाजी महाराज यांचा जन्म कोणत्या किल्ल्यावर झाला ? या प्रश्नाला ६० उत्तर दात्यानी पुरंदर हे उत्तर दिले तर ४० उत्तरदात्यानी रायगड हे उत्तर दिले यावरून लक्षात येते बहुतांश लोकाना छ. संभाजी महाराज यांचा जन्माबाबत समाजात माहिती नाही आहे. छ. संभाजी महाराज यांच्या आईचे नाव काय होते ? या प्रश्नावर ९८ उत्तरदात्यानी सईबाई हे उत्तर दिले.तर ०२ उत्तरदात्यानी जीजाबाई हे उत्तर दिले तर छ. संभाजी महाराज यांच्या मुलांचे नाव काय होते ? याबाबत १०० उत्तरदात्यानी शाहू हे उत्तर दिले. व छ. संभाजी महाराज यांनी खालीलपैकी कोणत्या ग्रंथाचे लेखन केले ? या प्रश्नाला ९० उत्तरदात्यानी बुधभूषण तर १० उत्तरदात्यानी आज्ञापत्रे हे उत्तर दिले. तर छ. संभाजी महाराज यांच्या पहिल्या पत्नीचे नाव काय होते ? याबाबत ९७ उत्तरदात्यानी येशुबाई हे उत्तर दिले तर ०३ उत्तरदात्यानी ताराबाई हे उत्तर दिले. व छ. संभाजी महाराज यांची हत्या कोणी केली ? याप्रश्नाला ९९ उत्तरदात्यानी औरंगजेब हे उत्तर दिले तर , ०१ – उत्तरदात्यानी शाहिस्तेखान हे उत्तर दिले. तर छ. संभाजी महाराज यांची हत्या कधी करण्यात आली ? या बाबत ८५ उत्तरदात्यानी ११ मार्च १६८९ हे उत्तर दिले तर १५ उत्तरदात्यानी १४ मार्च १६९० हे उत्तर दिले. व छ. संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक कोणत्या किल्ल्यावर संपन्न झाला ? या प्रश्नाला ९९ लोकांनी रायगढ़ हे उत्तर दिले तर ०१ उत्तरदात्यानी सिंहगढ़ हे उत्तर दिले तर छ. संभाजी महाराज यांची समाधीस्थल महाराष्ट्रात कुठे आहे ? या प्रश्नाला ९७ उत्तरदात्यानी वढु( बद्रुक ) तर ०३ उत्तरदात्यानी तुळापुर हे उत्तर दिले. अशा प्रकारे प्राप्त माहितीच्या आधारावर पुढील निष्कर्ष लक्षात येतात.


**निष्कर्ष :**

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्राबाबत ग्रामीण महाराष्ट्रिय समाजात फारशी माहिती आढळून येत नाही. पाहिजे त्या प्रमाणात छ. संभाजी महाराज यांची जयंती साजरी केली जात नाही. छ.संभाजी महाराजांच्या जिवनातील ऐतिहासिक घटनाबबत लोकानां अत्यल्प माहिती असल्याचे दिसून येते.

मुलाखत घेत असताना महाविद्यालयाचे विद्यार्थी









# *Shri Saibaba Lok Prabodhan Arts College, Wadner*

## *Ta. Hinghanghat Dist. Wardha*

## *2023-2024*

# *History Department*

## *( Field work- Project )*

***Date. 06/04/2024***

| Sr. No. | Students Name | *Class ( Year)* | *Mo. Number* |
|---|---|---|---|
| 1 | Gaurav Vinod Hiwarkar | I | 7888011417 |
| 2 | ku. Vaishali Narayan Shemble | I | 7366723734 |
| 3 | Monali Vilas Ladikar | I | 7972879266 |
| 4 | Mayur Vilas Kshirsagar | I | 9359314858 |
| 5 | Ku.Sima Subhas Bawane | I | 8329891240 |
| s6 | Ku.Rajani Shrikrushna Umate | I | 9322481624 |
| 7 | Rohit Sunil Chandel | I | 9022842893 |
| 8 | Nikhil Sunilsingh Chandel | I | 9322784981 |
| 9 | Harshal Vitthal Ugemuge | I | 8421782718 |
| 10 | Mahesh Pandurang Palkar | I | 7875273226 |